Reg. No. NP CITY/236/2018-2020.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक २६] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट १९-२५, २०२१/श्रावण २८-भाद्रपद ३, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२०.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० ऑगस्ट २०२१.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-२६१९-११४-प्र.क्र.१६-नवि-३०-२०१९.—

ज्याअर्थी, शेगाव शहराची सुधारित विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधिले आहे) चे कलम ३१ नुसार, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अधिसूचना क्रमांक वि.यो. शेगाव (सु) टि.पी.व्ही-६-२७५५, दिनांक २६ एप्रिल १९९४ अन्वये मंजूर केली असून ती दिनांक १ ऑगस्ट, १९९४ पासून अंमलात आली आहे. (यापुढे " उक्त विकास योजना " असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे शेगाव, स.नं. २१९/३ मधील ६.८६ हे. आर आणि स.नं. २२२/१ मधील १.०२ हे. आर क्षेत्र असे एकूण ७.८८ हे. आर क्षेत्र (यापुढे "उक्त क्षेत्र" असे संबोधले आहे) हे भागशः कृषी तथा ना विकास विभाग, भागशः रहिवास विभाग, भागशः ३० मी. रूंद व १८ मी. रूंद विकास योजनेतील प्रस्तावित रस्ते व भागशः आ. क्र. ८० "चिल्ड्रेन्स पार्क" या विकास योजना प्रस्तावांनी बाधित आहे, (यापुढे "उक्त विकास योजना प्रस्ताव " असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, शेगाव नगर परिषदेने (यापुढे "उक्त नगर परिषदेने " असे संबोधले आहे) उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) मध्ये दिलेली वैधानिक पध्दती अनुसरून उक्त विकास योजनेतील उक्त विकास योजना प्रस्तावापैकी ना विकास विभागात समाविष्ट क्षेत्राचा वापर बदलून सार्वजनिक प्रयोजनासाठी करणेबाबतचा फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर, उक्त क्षेत्रावरील भागशः रहिवास विभाग, भागशः ३० मी. रूंद व १८ मी. रूंद विकास योजनेतील प्रस्तावित रस्ते व भागशः आ. क्र. ८० "चिल्ड्रेन्स पार्क" या विकास योजना प्रस्ताव वगळता उर्वरित कृषी तथा ना विकास विभागात समाविष्ट जमिनीवरील कृषी तथा ना विकास विभाग वगळून सदर जमीन "सार्वजनिक निमसार्वजनिक विभागात " समाविष्ट करण्यासाठी फेरबदल मंजूर करावा असे राज्य शासनाचे मत झाले आहे ;



अ.-एक-अ-१ (१५८९).

आणि ज्याअर्थी, मौ. शेगाव, उक्त जमिनीच्या मालकांनी सन २०२०-२१ या वर्षातील बाजारमूल्य तक्त्यानुसार येणा-या उक्त जमिनीच्या एकूण रकमेच्या ५% दराने येणा-या अधिमूल्य रक्कमेपैकी शासनास देय असलेली अधिमूल्याची ५०% रक्कम रुपये ४,६७,००० सहायक संचालक, नगर रचना, बुलडाणा शाखा, बुलडाणा यांच्या लेखाशीर्षामध्ये दि. १५-२-२०२१ रोजी जमा केली आहे आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली अधिमूल्याची ५०% रक्कम रु. ४,६७,००० दि. २६-०२-२०२१ रोजी शेगाव नगर परिषद, शेगाव यांच्या लेखाशिर्षामध्ये जमा केलेली आहे.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम ३७ पोट-कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकाराचा वापर करून उक्त विकास योजनेतील उक्त नमूद केलेल्या फेरबदलास शासन मंजुरी देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लेखित दिनांक २६ एप्रिल १९९४ ची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे ;

" विकास योजना मंजुरीच्या अधिसूचनांच्या फेरबदल सूचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे."

**नोंद**

" मौजे शेगाव, ता. शेगाव, जि. बुलडाणा स.नं. २१९/३ मधील ६.८६ हे. आर आणि स.नं. २२२/१ मधील १.०२ हे. आर क्षेत्र असे एकूण ७.८८ हे. आर क्षेत्रावरील भागशः रहिवास विभाग, भागशः ३० मी. रूंद व १८ मी. रूंद विकास योजनेतील प्रस्तावित रस्ते व भागशः आ. क्र. ८० "चिल्ड्रेन्स पार्क" हे विकास योजना प्रस्ताव वगळता उर्वरित कृषी तथा ना विकास विभागात समाविष्ट जमिनीवरील कृषी तथा ना विकास विभाग वगळून सदर जमीन "सार्वजनिक निमसार्वजनिक विभागात " समाविष्ट करण्यात येत आहे."

उक्त फेरबदल दर्शविणा-या भाग नकाशाची प्रत मुख्याधिकारी, शेगाव नगर परिषद, शेगाव यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

सदरची अधिसूचना शासनाच्या **www.maharashtra.gov.in/Acts&Rules** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**वीणा मोरे,**
अवर सचिव.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२१.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, Dated 10th August 2021.

THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS-2619/114/CR-16/UD-30-2019.—

Whereas, the Revised Development Plan of Shegaon City, Dist.-Buldana has been sanctioned by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune under Section 31 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as " the said Act ") *vide* Notification No. D.S. Shegaon-TPV-6-2755 dated 26th April 1994 and it has come into force with effect from the 1 August 1994 (hereinafter referred to as "the said Development Plan") ;

And whereas, in the said Development Plan, land admeasuring 6.86 H. A. out of Survey 219/3 and land admeasuring 1.02 H. A. out of Survey 222/1 Mouja Shegaon, (Total 7.86 H. A.) (hereinafter referred to as "the said land") is affected by partly Agriculture/No Development Zone, partly Residential Zone, partly 30 m. and 18 m. wide proposed Development Plans roads and partly by Site No. 80 "Children's Park" (hereinafter referred to as "the said Development Plan proposals") ;

And whereas, Shegaon Municipal Council (hereinafter referred to as "the said Council ") after following all the legal formalities stipulated under Section 37(*1*) of the said Act, has submitted to the Government for its sanction a

proposal for modification to the said Development Plan so as to change the user of the land affected by No Development Zone out of the said land, to that of "Public Utility".

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, the Government is of opinion that excluding the lands affected by partly Residential Zone, partly 30 m. and 18 m. wide proposed Development Plan roads and partly by Site No. 80 "Children's Park" out of the said land, remaining land affected by the Agriculture/No Development Zone should be deleted from the Agriculture/No Development Zone and included in "Public Semipublic Zone", and accordingly the modification should be sanctioned.

And whereas, the Land owners of the said land have deposited Rs. 4,67,000 towards the 50% Government share of 5% premium amount as per the rate of said land as perscribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2020-21 in the Government Treasury on 15-2-2021, through the Assistant Director of Town Planning, Buldana Branch, Buldana and the remaining 50% of the 5% premium amount of Rs. 4,67,000 has been deposited with the Shegaon Municipal Council, Shegaon on 26-2-2021.

Now, therefore, in exercise of the powers conferred on it under sub-section (*2*) of Section 37 of the said Act, the Government of Maharashtra hereby sanction the said proposed Modification with the terms and conditions mentioned below and for that purpose amends the above said modification dated the 26-4-1994 as follows :—

" In the Schedule of Modification appended to the Notification sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry.":—

*ENTRY*

"Out of the land admeasuring 6.86 H. A. out of Survey 219/3 and land admeasuring 1.02 H. A. out of Survey 222/1 Mouja Shegaon, (Total 7.86 H.A.) excluding the lands affected by partly Residential Zone, Partly 30 m. and 18 m. wide proposed Development Plan, roads and partly by Site No. 80 "Children's Park", the remaining land affected by the Agriculture/No Development Zone is deleted from the Agriculture/ No Development Zone and included in "Public Semipublic Zone".

A copy of the part plan showing the aforesaid sanctioned modification shall be available in the office of the Chief Officer, Shegaon Municipal Council during office hours on all working days for inspection of public for a period of one month.

This Notification shall also be published on the Govt. website *www.maharashtra.gov.in/Acts & Rules.*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VEENA MORE,
Under Secretary.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.